महाराष्ट्र शासन -कृषी विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३० ब, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई-४०० ००५
दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/२ ई-मेल :-mahapocra@gmail.com

जा क्र. नादेकृसंप्र- १११८ / प्र क्र १६८/ कृव्यवि / ५२४ दि. ७.१२.२०१८

प्रति,

प्रकल्प संचालक, आत्मा
(प्रकल्पांतर्गत सर्व जिल्हे)

विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रोत्साहन देणे घटकांतर्गत भाडेतत्वावर कृषि अवजारे सेवा केंद्रांची निर्मिती करणे-अवजारे खरेदी व शेड बांधकाम मार्गदर्शक सूचना सन २०१८-१९

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रोत्साहन देणे घटकांतर्गत भाडेतत्वावर कृषि अवजारे सेवा केंद्रांची निर्मिती करणे-अवजारे खरेदी व शेड बांधकाम मार्गदर्शक सूचना सन २०१८-१९ (B1.2) हा मंजूर घटक राबविण्यासाठी मार्गदर्शक सूचना सहपत्रित करण्यात येत आहेत.

पात्र लाभार्थींना पुर्वसंमती पत्रासोबत प्रकल्पांतर्गत प्रापण (खरेदी) विषयक बाबींसाठी मार्गदर्शक सूचना तसेच सामाजिक व पर्यावरण विषयक छाननीसूची सह सुरक्षा विषयक उपाययोजना नियमावली देणे आवश्यक आहे.

सोबतच्या मार्गदर्शक सूचनानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सोबत :- वरीलप्रमाणे

प्रकल्प संचालक
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई

प्रत- माहितीस्तव सादर

१. सचिव, कृषि व पणन विभाग, मंत्रालय, मुंबई

माहिती व पुढील कार्यावाहीस्तव अग्रेषित

२. आयुक्त, कृषि , कृषि आयुक्तालय, पुणे
३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (प्रकल्पांतर्गत सर्व)
४. उप विभागीय कृषि अधिकारी, (प्रकल्पांतर्गत सर्व)

# भाडे तत्त्वावर कृषि अवजारे सेवा केंद्रांची निर्मिती करणे

(प्रकल्प उपक्रम सांकेतांक-B1.2)

## १. प्रस्तावना:

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदला विषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणी साठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भू-भाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्प भू-धारक शेतकऱ्यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

राज्यात शेतकऱ्यांची कमी होणारी जमीनधारणा, शेतीसाठी भांडवल पुरवठ्यास आलेल्या मर्यादा, तांत्रिकीकरणास असलेला वाव, तसेच जमिनीची कमी होत असलेली उत्पादकता, ग्रामीण भागामध्ये दिवसेंदिवस शेती कामांमध्ये मजुरांची कमी होणारी संख्या, मजुरीवरील वाढता खर्च व मशागतीच्या कामामधील वेळेच्या अनिश्चिततेमुळे पिक उत्पादनाचा वाढीव खर्च या समस्येमुळे शेतामध्ये यांत्रिकीकरण वाढविणे आवश्यक आहे. शेतीमध्ये विविध कामांसाठी वापरली जाणारी सर्व अवजारे खरेदी करणे अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी व्यवहार्य बाब नाही. उत्पादकता वाढवण्यासाठी वेळेवर आणि अचूक कामे होणे आवश्यक आहे. हे शक्य करण्यासाठी शेती यंत्रे महत्वाची भूमिका बजावतात. नोंदणीकृत शेतकरी गट/बचत गट आणि शेतकरी उत्पादक कंपनी/संघ यांना कृषि अवजारे, उपकरणे व संयंत्रे अनुदानावर उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी अनेक अवजारे गरजेनुसार भाडे तत्त्वावर देण्याच्या उद्देशाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत “कृषि अवजारे सेवा केंद्रांची निर्मिती करणे” या उपघटकांतर्गत अवजारे खरेदी व ते ठेवण्यासाठी आवश्यक आकाराचे शेड बांधकाम या बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

## २. उद्दिष्टे:

२.१ भाडे तत्त्वावर कृषि अवजारे सेवांसाठी फार्म मशिनरी बँका स्थापन करणे.

२.२ छोट्या शेतकऱ्यांना कृषि अवजारांच्या उच्च किमतीमुळे उद्भवणाऱ्या समस्येवर मात करण्यासाठी व कृषि अवजारे वापरास प्रोत्साहित करण्यासाठी कृषि अवजारे सेवा केंद्रांची निर्मितीस प्रोत्साहन देणे.

२.३ अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांच्या शेतजमिनीवर यांत्रिकीकरणाची पोहोच वाढविणे.

२.४ हाय-टेक आणि उच्च मूल्य शेती उपकरणांची सेवा अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना वाजवी दरात उपलब्ध करणे.

२.५ पीक उत्पादनामध्ये सुधारित/नव्याने विकसित शेतीविषयक उपकरणांच्या वापरास प्रोत्साहन देऊन कार्यक्षमता व उत्पादनाचा दर्जा वाढविणे.

## ३. सदर घटकासाठी पात्र लाभार्थी व निवडीचे निकष:

३.१ प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्या/शेतकरी उत्पादक संघ.

३.२ प्रकल्पासाठी निवड झालेल्या गावातील कोणत्याही यंत्रणेकडे नोंदणी झालेले शेतकरी गट /बचत गट/ महिला /भुमिहिन व्यक्तींचे इच्छुक गट.

३.३ अर्जदार शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटांची आर्थिक परिस्थिती ही प्रस्तावीत कृषि अवजारे सेवा केंद्र उभारण्यासाठी व चालविण्यासाठी सक्षम असावीत.

३.४ स्थापित कृषि अवजारे सेवा केंद्रातील विकसित शेतीविषयक अवजारे व उपकरणे ही परिसरातील पीक पद्धतीवर आधारित असणे आवश्यक असून शेतकरी उत्पादक कंपनी/ संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटांच्या मार्फत गावसमुहातील अत्यल्प व अल्प शेतकऱ्यांना भाडेतत्वावर वाजवी दरात कृषि अवजारे उपलब्ध होणे आवश्यक आहे.

३.५ शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटांना कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणीसाठी नोंदणीकृत बँक/ वित्तीय संस्था यांचेकडून कर्ज मंजूर होणे आवश्यक आहे. (कर्जाची रक्कम हि मंजूर अनुदानाच्या किमान दीडपट असणे आवश्यक आहे.)

३.६ शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाने नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्था व प्रकल्प व्यवस्थापन कक्षाशी विहित नमुन्याप्रमाणे करार करावा.

## ४. अर्थसहाय्य:

४.१ कृषि अवजारे सेवा केंद्रासाठी आवश्यक कृषि अवजारे, उपकरणे व संयंत्रे आणि आवश्यकते नुसार शेड बांधकाम यांना एकूण खर्चाच्या ५० टक्के अनुदान देय राहील. अनुदानाची कमाल मर्यादा रु. ५० लाख राहील.

४.२ अनुदानासाठी कृषि अवजारे सेवा केंद्राच्या प्रकल्प अहवालामध्ये असलेल्या जमिनीच्या किमतीचा/ भाडेपट्ट्याच्या रकमेचा समावेश राहणार नाही.

४.३ या प्रकल्पांतर्गत अनुदान क्रेडिट लिंकड बॅक ऐंडेड सबसिडी (Matching Grants) या तत्वानुसार बँकेने मंजूर केलेल्या सर्व बाबी पूर्ण केलेनंतर व कृषि अवजारे सेवा केंद्र कार्यान्वित झाल्यानंतर देण्यात येईल.

४.४ प्रकल्प अहवालामध्ये सर्व आवश्यक घटक (कृषि अवजारे, उपकरणे,संयंत्रे, आवश्यकते नुसार शेड बांधकाम, विद्युतीकरण, प्रशिक्षण, प्रमाणिकरण इ.) अंतर्भूत करणे आवश्यक आहे.

४.५ स्थापित प्रकल्पाची मालकी अर्थसहाय्यासाठी अर्ज केलेल्या शेतकरी उत्पादक कंपनी/ संघ व नोंदणीकृत शेतकरी /बचत गटाची असेल. भागीदारी (Partnership) मध्ये असलेल्या प्रकल्पांसाठी अर्थसहाय्य देय नाही.

४.६ शेतकरी उत्पादक कंपनी/ संघ व नोंदणीकृत शेतकरी/ बचत गटांच्या क्षेत्रातील वाव विचारात घेऊन स्वत: कृषि अवजारे, उपकरणे व संयंत्रे निवडण्याची मुभा आहे.

४.७ ट्रॅक्टर खरेदी प्रस्तावित असल्यास संबधित गट /कंपनीकडे चालू स्थितीतील किमान ५ ट्रॅक्टरचलित अवजारे असणे अनिवार्य आहे. तसे नसल्यास प्रत्येक ट्रॅक्टर समवेत किमान पाच ट्रॅक्टरचलित कृषि अवजारे खरेदी करणे अनिवार्य आहे.

**आवश्यक कागदपत्रे:**

a. विहित नमुन्यातील अर्ज व हमीपत्र
b. अर्जदार कंपनी/संघ/गटाचे नोंदणी पत्र
c. DPR-सविस्तर प्रकल्प अहवाल (घटकांची बाबनिहाय आणि किंमतीनिहाय तपशीलवार माहिती, तसेच शेड बांधकामाचे अंदाजपत्रक)
d. शेतकरी उत्पादक कंपनी/संघ/गटाची अवजारे भाडेतत्वावर देण्याबाबतची नियमावली/पोट नियमावली
e. कृषि अवजारे सेवा केंद्रासाठी उपलब्ध जमिनीचा ७/१२, ८ अ (किंवा ३० वर्षे भाडेतत्वाचा करारनामा/ ना हरकत प्रमाणपत्र).
f. याव्यतिरिक्त नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेस कर्ज मंजुरीसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

## ५. अंमलबजावणीची कार्यपद्धती : अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या

### ५.१ लाभार्थी:

५.१.१ पात्र शेतकरी उत्पादक कंपनी / संघ व नोंदणीकृत शेतकरी / बचत गटांनी घटकांतर्गत बाबींचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यात अर्ज, हमीपत्र (प्रपत्र-१) व कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणीचा सविस्तर प्रकल्प अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा.

५.१.२ वित्तीय अधिकार नियम १९७८ भाग दूसरा नुसार प्रदान करण्यात आलेल्या शक्ति व वित्तीय मर्यादेनुसार (अनुदान रक्कम- प्रकल्प संचालक/कृषि व्यवसाय विशेषज्ञ (प्रकल्प स्तर) रु. २५ ते ५० लक्ष पर्यंत, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी/प्रकल्प संचालक, आत्मा रु. १० ते २५ लक्ष पर्यंत प्रती प्रस्ताव, उपविभागीय कृषि अधिकारी रु. १० लक्ष पर्यंत प्रती प्रस्ताव) सादर केलेली कागदपत्रे व कृषि अवजारे सेवा केंद्र-सविस्तर प्रकल्प अहवालाची तांत्रिक पडताळणी करून सक्षम अधिकारी पूर्वसंमती देतील. सदर पूर्वसंमती अर्जदार कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट व नोंदणीकृत वित्तीय संस्थेच्या नावे असेल.

५.१.३ प्रकल्प अहवालास पूर्वसंमती प्राप्त झाल्यानंतर पूर्वसंमती पत्रासह प्रकल्प अहवाल नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेकडे सादर करावयाचा आहे. कर्ज मंजूर झाल्यानंतर (उपलब्ध कर्जाची रक्कम ही किमान अनुदानाच्या दीडपट रकमे इतकी असणे आवश्यक आहे) कर्ज मंजुरीचे पत्र उपविभागीय कृषि अधिकारी यांना सादर करावे.

५.१.४ नोंदणीकृत बँक / वित्तीय संस्थेला कर्ज मंजुरीसाठी सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता

शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाने करावयाची आहे. तसेच प्रकल्प व्यवस्थापन कक्ष व नोंदणीकृत वित्तीय संस्था यांचे बरोबर आवश्यक करारनामे (MoU) करावयाचे आहेत.

५.१.५ नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेच्या नियमावलीनुसार कर्ज मंजुरीसाठी आवश्यक असलेला स्वहिश्याची रक्कम उभारणे अनिवार्य आहे.

५.१.६ पूर्वसंमती मध्ये नमूद मुदतीमध्ये कृषि अवजारे सेवा केंद्राची उभारणी व समाविष्ठ बाबींची खरेदी करावयाची असून कृषि अवजारे सेवा केंद्र भाडेतत्वावर पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणे आवश्यक आहे.

५.१.७ प्रकल्प अहवालामध्ये प्रस्तावित केल्यानुसार तांत्रिक मापदंडानुसार कृषि अवजारे, उपकरणे व संयंत्रे खरेदी करणे आवश्यक आहे.

५.१.८ कृषि अवजारे सेवा केंद्राची उभारणीपूर्वी, उभारणीदरम्यान व उभारणी पश्चात तपासणीसाठी व आवश्यक कागदपत्रे (परवानग्या, बिले इ.) दाखविण्यासाठी नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी व प्रकल्पाचे अधिकारी यांना सहकार्य करावयाचे आहे.

५.१.९ कर्ज मंजूर करणाऱ्या नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेमध्ये अर्जदार शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाच्या नावे कर्ज खाते उघडणे बंधनकारक आहे.

५.१.१० कृषि अवजारे सेवा केंद्राची उभारणी तसेच समाविष्ठ बाबींची खरेदी जागतिक बँकेने निर्धारित केलेल्या प्रापण पद्धतीनुसार करावयाची आहे. याबाबतची नियमावली उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून प्राप्त करून घ्यावी. तसेच पूर्वसंमती पत्रासोबत सामाजिक व पर्यावरण विषयक नियमावली उपलब्ध करून देण्यात येईल व त्याचे पालन करावे.

५.१.११ उभारणी केलेल्या कृषि अवजारे सेवा केंद्राबाबत व अवजारे पुरविण्यात येणाऱ्या भाडे दराबाबत परिसरात पुरेशी प्रसिद्धी करावी.

५.१.१२ खरेदी केलेली कृषि अवजारे ठेवण्यासाठी आवश्यकतेनुसार पुरेशा आकाराचे शेड बांधणे आवश्यक आहे.

अवास्तव आकाराच्या शेड बांधकामाचा प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही.

५.१.१३ कृषि अवजारांची देखभाल व निगा राखणेची जबाबदारी लाभार्थी गटाची राहील. सदर सेवा केंद्र किमान पाच वर्ष कार्यरत राहील याबाबतची जबाबदारी लाभार्थी गटाने घ्यावयाची आहे.

५.१.१४ प्रकल्प उभारणी पूर्ण करून त्याची कार्यवाही भाडेतत्वावर पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झालेबाबत उपविभागीय कृषि अधिकारी यांना प्रपत्र ४ मध्ये अवगत करावे.

५.१.१५ कृषि अवजारांच्या दर्जाबाबत लाभार्थी गटाने स्वत: खात्री करावयाची आहे. यासाठी राष्ट्रीय स्तरावरील कृषि अवजारे चाचणी संस्था, कृषि विद्यापीठे, अभियांत्रिकी महाविद्यालये यांची मदत घ्यावी.

## ५.२ उपविभागीय कृषि अधिकारी:

५.२.१ विहित नमुन्यातील अर्ज व सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे अर्जदार शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/ बचत गट प्रस्तावित कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणीसाठी सक्षम असल्याबाबत खात्री करावी.

५.२.२ अर्जदार शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/ बचत गट यांचे नियोजित प्रकल्प स्थळास भेट देऊन कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणीसाठी योग्य असल्याची खात्री करावी. उभारणी पूर्व मोका तपासणीचे शेतकरी उत्पादक कंपनी/संघ किंवा नोंदणीकृत शेतकरी/बचत गट प्रमुखासह अक्षांश रेखांश सह छायाचित्र काढून संगणक प्रणालीवर अपलोड करावेत. वित्तीय अधिकार नियम १९७८ नुसार वरिष्ठ स्तरावर मंजुरी आवश्यक असल्यास स्वयंस्पष्ट अभिप्रायासह इच्छुक लाभार्थ्यांचा विहित नमुन्यातील अर्ज, प्रकल्प अहवाल व सादर केलेली कागदपत्रे प्रकल्प संचालक, आत्मा कार्यालयास सादर करावीत.

५.२.३ सादर केलेल्या प्रकल्प अहवालाची कृषि व्यवसाय विशेषज्ञ यांचे मदतीने पडताळणी करून योग्य प्रस्तावांना वित्तीय अधिकार नियम १९७८ भाग दूसरा इ २८, २९ नुसार लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट व नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्था यांचे नावे विहित नमुन्यातील पूर्वसंमती पत्र द्यावे/पूर्वसंमती पत्रासाठी शिफारस करावी. शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटांबरोबर MoU करावा. (अनुदान रक्कम मर्यादा- जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी किंवा प्रकल्प संचालक, आत्मा रु. २५ लक्ष प्रती प्रस्ताव, उपविभागीय कृषि अधिकारी रु. १० लक्ष पर्यंत प्रती प्रस्ताव).

५.२.४ सदर घटकांतर्गत प्राप्त अर्ज, पूर्वसंमती, प्रकल्प उभारणीबाबत प्रगती व प्रकल्प पूर्ण उभारणीबाबत वेळोवेळी होणाऱ्या प्रकल्पासाठीच्या जिल्हास्तरीय समितीच्या बैठकामध्ये माहिती द्यावी.

५.२.५ प्रस्तावित प्रकल्पास नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेकडून कर्ज मंजूर होण्यासाठी अर्जदार शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटास सहकार्य करावे. यासाठी संबधित बँक, जिल्हा अग्रणी बँक, जिल्हास्तरीय बँकर्स समिती व जिल्हाधिकारी यांचेशी समन्वय साधावा.

५.२.६ प्रकल्प उभारणी दरम्यान आवश्यकतेनुसार प्रकल्प स्थळास भेटी द्याव्यात व प्रकल्पाची उभारणी तांत्रिक निकषानुसार असल्याची खात्री करावी.

५.२.७ प्रकल्प उभारणीनंतर प्रकल्प उभारणी पूर्ण झाल्याचे लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी / संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाने अवगत केल्यावर नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेचे प्रतिनिधी व लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट प्रमुखासमवेत विहित नमुन्यात मोका तपासणी करावी. उभारणी पश्चात मोका तपासणीचे लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाचे प्रमुख, नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेच्या प्रतिनिधीसह अक्षांश रेखांश सह छायाचित्र काढून संगणक प्रणालीवर अपलोड करावेत.

५.२.८ प्रकल्प उभारणी ही जागतिक बँकेने निर्धारित केलेल्या प्रापण पद्धतीनुसार आहे याची खात्री करावी. याबाबतची नियमावली पूर्व संमती पत्रासोबत उपलब्ध करून द्यावी.

५.२.९ पात्र प्रस्तावांची देय अनुदान अदायगी करण्यापूर्वी खरेदी करण्यात आलेली कृषि अवजारे, उपकरणे व यंत्राच्या किंमती या कृषि विभागाच्या www.agrimachinery.nic.in संकेतस्थळावर असलेल्या किमतीशी पडताळणी करावी. तसेच या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या कृषि अवजारांच्या किमतीची उत्पादक/खुल्या बाजारातील किंमतीसोबत पडताळणी करावी.

५.२.१० तपासणी अहवालासह शिफारस झालेल्या पात्र प्रस्तावांची देय अनुदान अदायगी प्रस्ताव प्राप्त झाल्या पासून १० दिवसात (निधी उपलब्धतेनुसार) DBT द्वारे थेट लाभार्थ्यांना प्रकल्पासाठी उभारलेल्या कर्ज खात्यांमध्ये करावी.

५.२.११ लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाने अवगत केल्यानंतर १००% लाभार्थ्यांची तपासणी करावी. (प्रपत्र-७)

## ५.३ प्रकल्प संचालक, आत्मा:

५.३.१ उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून प्राप्त संभाव्य अनुदान रक्कम रु. १० ते २५ लाख अनुदान रक्कम असलेल्या प्रस्तावांची प्राप्त कागदपत्र व प्रकल्प अहवाल याआधारे अर्जदार शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी /बचत गटाने कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणीसाठी सक्षम असल्याबाबत खात्री करावी.

५.३.२ वरीलप्रमाणे अर्जदार शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट व नियोजित प्रकल्प स्थळास भेट देऊन नियोजित प्रकल्प स्थळ प्रस्तावित प्रकल्पासाठी योग्य असल्याची खात्री करावी. उभारणी पूर्व मोका तपासणीचे शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट प्रमुखासह अक्षांश रेखांश सह छायाचित्र काढून संगणक प्रणालीवर अपलोड करावेत.

५.३.३ प्राप्त प्रकल्प अहवालाची कृषि व्यवसाय विशेषज्ञ यांचे मदतीने पडताळणी करून योग्य प्रस्तावांना (वित्तीय अधिकार नियम १९७८ भाग दूसरा इ २८,२९ नुसार) शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट व नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्था यांचे नावे विहित नमुन्यातील पूर्वसंमती पत्र द्यावे/पूर्वसंमती पत्रासाठी शिफारस करावी.

५.३.४ प्रस्तावित प्रकल्पास नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेकडून कर्ज मंजूर होण्यासाठी अर्जदार शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटास सहकार्य व मार्गदर्शन करावे. यासाठी जिल्हा अग्रणी बँक व जिल्हाधिकारी यांचेशी समन्वय साधावा. जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या बैठकीमध्ये याबाबत नियमित आढावा घ्यावा.

५.३.५ सदर घटकांतर्गत जिल्ह्यामधून प्राप्त अर्ज, पूर्वसंमती, प्रकल्प उभारणीबाबत प्रगती व पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या सद्यस्थितीबाबत प्रकल्पासाठीच्या जिल्हास्तरीय समितीच्या वेळोवेळी होणाऱ्या सभेमध्ये अवगत करावे.

५.३.६ उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून प्राप्त संभाव्य अनुदान रक्कम रुपये १० लक्ष ते २५ लाखापर्यंत अनुदान रकमेचे असलेल्या प्रकल्पांना पूर्वसंमती व अनुदान अदायगीची कार्यवाही करावयाची आहे.

५.३.७ पात्र प्रस्तावांची देय अनुदान अदायगी करण्यापूर्वी खरेदी करण्यात आलेली कृषि अवजारे, उपकरणे व यंत्राच्या किंमती या कृषि विभागाच्या www.agrimachinery.nic.in संकेतस्थळावर असलेल्या किमतीशी पडताळणी करावी. तसेच या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या कृषि अवजारांच्या किमतीची उत्पादक/खुल्या बाजारातील किंमतीसोबत पडताळणी करावी.

५.३.८ पूर्वसंमती दिलेल्या प्रकल्पांना उभारणीपूर्व, उभारणी दरम्यान व उभारणी पश्चात भेटी द्याव्यात व सर्व लाभार्थ्यांची तपासणी करावी.

५.३.९ प्रकल्प पूर्ण झाल्याचे शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाने अवगत केल्यानंतर नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाचे प्रमुख यांचे समवेत उभारणीपश्चात प्रकल्पास भेट देऊन विहित नमुन्यातील मोका तपासणी पूर्ण करावी. प्रकल्पासमवेत लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाचे प्रमुख, नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेचे प्रतिनिधी यांचेसह तपासणीचे छायाचित्र अक्षांश व रेखांश सह प्रकल्पाच्या संकेत स्थळावर अपलोड करावेत.

## ५.४ कृषि व्यवसाय विशेषज्ञ (प्रकल्प स्तर):

५.४.१ उपविभागीय कृषि अधिकारी यांची शिफारस विचारात घेऊन अर्जदार शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/ बचत गट यांचे नियोजित प्रकल्प स्थळास भेट देऊन कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणीसाठी योग्य असल्याची खात्री करावी. उभारणी पूर्व मोका तपासणीचे शेतकरी उत्पादक कंपनी/संघ किंवा नोंदणीकृत शेतकरी/बचत गट प्रमुखासह अक्षांश रेखांश सह छायाचित्र काढून संगणक प्रणालीवर अपलोड करावेत.

५.४.२ उपविभागीय कृषि अधिकारी यांचेकडून प्राप्त संभाव्य अनुदान रक्कम रुपये २५ लक्ष ते ५० लक्ष पर्यंत अनुदान रकमेचे असलेल्या प्रकल्पांना पूर्वसंमती व अनुदान अदायगीची कार्यवाही करावयाची आहे.

५.४.३ पूर्वसंमती दिलेल्या प्रकल्पांना उभारणीपूर्व, उभारणी दरम्यान व उभारणीपश्चात भेटी द्याव्यात.

५.४.४ प्रकल्प पूर्ण झाल्याचे शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाने अवगत केल्यानंतर नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाचे प्रमुख यांचे समवेत उभारणीपश्चात प्रकल्पास भेट देऊन विहित नमुन्यातील मोका तपासणी पूर्ण करावी. प्रकल्पासमवेत लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाचे प्रमुख, नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेचे प्रतिनिधी यांचेसह तपासणीचे छायाचित्र अक्षांश व रेखांश सह प्रकल्पाच्या संकेत स्थळावर अपलोड करावेत.

**प्रपत्र-१**

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन - कृषि विभाग

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

प्रकल्पांतर्गत शेतकरी उत्पादक गट/ शेतकरी उत्पादक कंपनी/ स्वयंसहाय्यता गट यांनी अर्थसहाय्यासाठी करावयाचा अर्ज

==========================================

प्रति,

उप विभागीय कृषि अधिकारी,
उपविभाग..........................
जिल्हा .............................

महोदय,

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत ------------------------ शेतकरी उत्पादक गट/ शेतकरी उत्पादक कंपनी/ स्वयंसहाय्यता गट --------------------- प्रक्रिया उद्योगामध्ये गुंतवणूक करणेस तयार आहे, त्याकरिता प्रकल्पांतर्गत खालील घटकाकरिता निवड होणेसाठी विनंती अर्ज सादर करत आहे.

घटकाचे नाव- ...................................................................

घटकाचा तपशील- ............................................................

| अ) अर्ज करणाऱ्या गटाचा तपशील | |
|---|---|
| १. गटाचे नाव - | |
| २. गटाचा प्रकार (FPC/FPO/SHG/FIG/इतर) - | |
| ३. ज्या यंत्रणे/ कार्यालयाकडे नोंदणी झाली आहे त्या यंत्रणे/कार्यालयाचे नाव | |
| ४. नोंदणी क्रमांक व दिनांक | |
| ५. गटाचे कार्यक्षेत्र (गावाची संख्या व तालुक्यांची नावे व जिल्हा) - | |
| ६. गटातील एकूण सभासद संख्या - | स्त्रिया ☐ पुरुष ☐ एकूण ☐ |
| ७. नोंदणी करताना गटाचा पूर्ण पत्ता- | गाव.................. पोस्ट...................... <br> तालुका............जिल्हा...................... <br> पिन क्र.- ☐ ☐ ☐ ☐ ☐ ☐ |

| | |
|---|---|
| ८. दुरध्वनी क्र. (STD कोड सह) - | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ९. मुख्य प्रवर्तकाचे नाव - | |
| १०. मुख्य प्रवर्तकाचा भ्रमणध्वनी क्र.- | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ११.संपर्कासाठी ई-मेल आयडी- | |
| १२. गटाचे सचिव /मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे नाव | |
| १३. गटाचे सचिव /मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा भ्रमणध्वनी क्र.- | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| **कृषि अवजारे सेवा केंद्र व्यवसायाबाबतचा पूर्वानुभव -** | |
| अ. प्रशिक्षण घेतले आहे का ? | |
| ब. असल्यास कोठे ? | |
| क. अभ्यास दौरा/ भेट दिली आहे का ? कोठे ? | |
| प्रस्तावित कृषि अवजारे सेवा केंद्राचा एकूण खर्च (रु.) | |
| प्रकल्पांतर्गत वार्षिक रोजगार निर्मिती (मनुष्यदिन) (संख्या) | |
| हंगामी | |
| कायमस्वरुपी | |
| तांत्रिक | |
| अतांत्रिक | |
| परिसरातील सुरु असलेल्या याच प्रकारच्या इतर कृषि अवजारे सेवा केंद्राबाबत थोडक्यात तपशील | |

**ब) प्रस्तावित कृषि अवजारे सेवा केंद्राचा तपशील**

| | | | |
|---|---|---|---|
| कृषि अवजारे सेवा केंद्राचे नाव- | | | |
| कृषि अवजारे सेवा केंद्राचे ठिकाण | गाव - | तालुका - | जिल्हा - |
| गटाच्या मालकीची जमिन (हे./आर) -<br>सर्व्हे नंबर - | | | |
| शेडची व्यवस्था | स्वतःचे | भाड्याचे | |
| मनुष्यबळ आवश्यकता (संख्या) | तांत्रिक - | अतांत्रिक - | |
| मनुष्यबळ उपलब्धता (संख्या) | तांत्रिक - | अतांत्रिक - | |
| मनुष्यबळ आवश्यकता (संख्या) | हंगामी - | कायमस्वरूपी - | |
| मनुष्यबळ उपलब्धता (संख्या) | हंगामी - | कायमस्वरूपी - | |
| कृषि अवजारे सेवा केंद्राचा लाभ अल्प/अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना होतो का ? | होय / नाही | | |

| कृषि अवजारे सेवा केंद्राद्वारे उपलब्ध होणाऱ्या अवजारांसाठी मागणी असलेबाबत थोडक्यात विवेचन | |
|---|---|
| अ. मागणीचा कालावधी | |
| ब. वार्षिक क्षमता (हे.) | |

**क) प्रस्तावित कृषि अवजारे सेवा केंद्राचा खर्च**

| अ.क्र. | अवजारे/उपकरणे/संयंत्राचे नाव | आवश्यक संख्या | अंदाजित रक्कम (रु.) | उत्पादकाचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |
| **एकूण** | | | | |

| | | |
|---|---|---|
| **निधी उपलब्धता** | स्व हिस्सा (रु.) | |
| | बँक कर्ज (रु.) | |
| | प्रकल्पातून अंदाजित मिळणारे अनुदान (रु.) | |
| | प्रस्तावित बँकेचे नाव व शाखा | |
| | यापूर्वी घेतलेले कर्ज (रु.) | |
| | शिल्लक परतफेड (रु.) | |

**ड) प्रकल्प आराखडयामध्ये खालील बाबी आवश्यक आहेत.**

| | |
|---|---|
| १. Cash Flow Statement | |
| २. Net present value statement | |
| ३. चालू कर्जाच्या परतफेडी बाबत बँकेचे स्टेटमेंट | |
| ४. | |
| ५. | |

**कृषि अवजारे सेवा केंद्राच्या आराखड्यामध्ये खालील बाबींबाबत तपशील असणे आवश्यक आहे .**

| | |
|---|---|
| १. सध्याची कृषि अवजारे स्थिती | २. मागणी |
| ३. भाडेतत्वावर कृषि अवजारे देणेबाबतचे धोरण | ४. इन्शुरन्स बाबत तपशील |

**अमंलबजावणी वेळापत्रक**

| |
|---|
| प्रकल्पाचे टप्पे, अमंलबजावणी तारीख (Bar charts, Milestone Charts सोबत द्यावे) |
| तंत्रज्ञान व व्यवस्थापकीय चा तपशील (कार्य, देखभाल, वित्त्, विपणन इ.) आवश्यकता व उपलब्धता बाबत सविस्तर तपशील द्यावा |

१. मला / आम्हाला कल्पना आहे की, सदर घटकांतर्गत प्रकल्पातून लाभ घेण्यासाठी नोंदणीकृत बँकेचे/ वित्तीय संस्थेचे कर्ज घेणे अनिवार्य आहे. सदर नोंदणीकृत बँक/ वित्तीय संस्था स्वतंत्रपणे प्रकल्पाची तांत्रिकदृष्ट्या (technically feasible) व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्यता (financially viable) तपासून त्यांचे धोरणानुसार प्रस्ताव मंजूर करतील. त्यासाठी सदर नोंदणीकृत बँक/ वित्तीय संस्थेशी आवश्यक करारनामा करण्यास आम्ही तयार आहोत. सदर करारनाम्यात प्रकल्पाच्या प्रापण, आर्थिक, पर्यावरणीय तसेच सामाजिक आराखड्यातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करण्याचा उल्लेख असेल तसेच जागतिक बँकेच्या लाचलुचपत प्रतिबंधक मार्गदर्शक सूचनांचा पालन करण्याचा उल्लेख असेल. त्याच धर्तीवर प्रकल्प व्यवस्थापन कक्षाबरोबर आवश्यक करारनामा करण्यात येईल. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रकल्प अधिकारी व नोंदणीकृत बँक/ वित्तीय संस्था यांनी तपासणी करून शिफारस केल्याप्रमाणे अनुदान बँकेकडे (back – ended subsidy) कर्ज खाती जमा केले जाईल.
२. सदर घटकासाठी माझी / आमची निवड झाल्यास आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन विहीत मुदतीत प्रकल्पाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार तसेच प्रकल्प अधिकाऱ्यांच्या तांत्रिक देखरेखीखाली काम पूर्ण केल्या नंतरच अनुदान देय राहील.
३. सदरचे काम विहित मुदतीत व मार्गदर्शक सुचनेप्रमाणे पूर्ण न केलेस अनुदान मिळणार नाही, याची मला / आम्हाला जाणीव आहे.
४. सदर बाबीचा लाभ घेत असतांना वा त्यानंतर गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास अथवा लाभांकित बाबीचा गैरवापर झाल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित घटकासाठी मिळालेले अनुदान सव्याज वसूल केले जाईल. याची मला /आम्हाला स्पष्ट जाणीव आहे.
५. प्रकल्पाचे अधिकारी आणि इतर प्राधिकृत व्यक्तींना प्रकल्प व अनुषंगिक बाबी तपासणीसाठी माझी / आमची संमती राहील तसेच, त्यांना या कामासाठी सहकार्य करण्यात येईल.

वरील सर्व माहिती आमच्या समजुतीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

स्थळ:-

दिनांक- **शेतकरी उत्पादक कंपनीच्या/ गटाच्या मुख्य प्रवर्तकाची सही**

सोबत खालील बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे. :-

१. नोंदणी प्रमाणपत्र
२. व्यवसाय आराखडा
३. मागील आर्थिक वर्षाचा जमाखर्चाचा ताळेबंद ( Balance sheet )
४. नजीकच्या काळात झालेल्या लेखापरीक्षणाचा अहवाल

**प्रपत्र - २**

प्रकल्प स्थळ पाहणी व पात्रतेबाबत अभिप्राय-उपविभागीय कृषि अधिकारी

**(कृषि अवजारे सेवा केंद्र/शेड बांधणी)**

मे. ---------------------------------------------------- या शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट (प्रमुख प्रवर्तक- श्री./श्रीमती. ---------------------------------) यांनी नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत ------------------------------- या प्रकल्पासाठी अनुदान मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. यापूर्वी सदर प्रकल्पासाठी/ प्रकल्पातील घटकासाठी इतर कोणत्याही शासकीय योजनेतून लाभ घेतलेला नाही/प्रस्तावित नाही. सदर शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट योजनेच्या निकषाप्रमाणे पात्र आहे.

दिनांक --------------- रोजी भेट देऊन प्रकल्प स्थळाची पाहणी केली आहे. अर्जासोबत सादर केलेली कागदपत्र, प्रकल्प अहवाल, प्रकल्पाचे नियोजित स्थळ व त्या परिसरातील एकंदर पीक पद्धती पाहता सदर प्रकल्प योग्य असून राबविण्यासाठी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट सक्षम आहे. सदर शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटास --------------------- या प्रकल्पासाठी पूर्वसंमती देण्यात येत आहे/देण्यासाठी शिफारस करणेत येत आहे.

**उपविभागीय कृषि अधिकारी**
**(प्रकल्प संचालक, आत्मा/प्रकल्प संचालक अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी)**
**मुख्यालय --------------------**
**नाव -------------------------**
**स्वाक्षरी ----------------------**
**दिनांक ----------------------**

(टीप-उपविभागीय कृषि अधिकारी यांनी मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून उपरोक्त स्थळ तपासणी अहवाल भौगोलिक चिन्हांकनासह (Geo-tagging) द्यावा.)

**प्रपत्र - ३**

**पूर्वसंमती पत्र**

जा.क्र. -----------------

कार्यालय- उपविभागीय कृषि अधिकारी, ____

उपविभाग ________,जिल्हा________

दिनांक -    /    /२०

**प्रति,**

१. **प्रमुख प्रवर्तक**

-----------------

२. **व्यवस्थापक**

बँक/वित्तीय संस्था

**विषय** :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी करीता पूर्वसंमती देणेबाबत

**संदर्भ :-** शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाचा दिनांक ---------चा अर्ज.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत "कृषि अवजारे सेवा केंद्र" या बाबीसाठी अर्थसहाय्य मिळण्यासाठी आपण अर्ज सादर केला आहे. सद्यस्थितीत सदर घटकातंर्गत खालील लागू असलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून आपल्या प्रकल्पास अनुदान देण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. सदर पूर्वसंमती पत्र म्हणजे अनुदान मंजुरीपत्र नाही.

आपण सादर केलेल्या प्रकल्प अहवालाच्या आधारे आपल्या प्रकल्पास रु.---------------- लाख एवढे अनुदान रकमेस तत्वत: मान्यता (In Principle Approval) देण्यात येत असून कर्ज मंजुरीनंतर आपण एक महिन्याच्या आत काम सुरु करावे.

१) प्रकल्पास तत्वत: मंजुरी मिळाल्यापासून लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटांना ----- महिन्यांच्या आत कृषि अवजारे सेवा केंद्राची निर्मिती करणे बंधनकारक राहील.

२) सदर पूर्वसंमती पत्राच्या आधारे नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेकडून किमान अनुदानाच्या दीडपट रकमेचे कर्ज घेणे आवश्यक आहे. नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेकडून कर्ज घेण्यासाठी त्यांचे नियमावली प्रमाणे आवश्यक बाबींची पूर्तता लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाने करावयाची आहे.

३) सदर प्रकल्पास अथवा प्रकल्पातंर्गत बाबींसाठी केंद्र किंवा राज्यशासनाकडून अनुदान/ अर्थसहाय्याचा लाभ घेतला असल्यास अथवा मागणी केली असल्यास या कार्यालयास अवगत करणे बंधनकारक आहे .

४) प्रकल्प अर्थसहाय्यासाठी ज्या आर्थिक वर्षात मंजूर केला जाईल त्या वर्षीच्या प्रचलीत मापदंडानूसार अनुदान / अर्थसहाय्य देय राहील.

५) कृषि अवजारे सेवा केंद्रासाठी आवश्यक बाबींची खरेदी व आवश्यकतेनुसार शेड बांधकाम पुर्ण केल्याबाबत व कृषि अवजारे सेवा केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झालेबाबत लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटांने पूर्वसंमती देणाऱ्या अधिकाऱ्यास अवगत करावयाचे आहे. योजनेच्या व बँक कर्ज मंजुरीच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून प्रकल्प कार्यान्वित झालेनंतर करावयाच्या मोका तपासणीच्या आधारे ज्यामध्ये तज्ञ सल्लागार, प्रकल्पाचे अधिकारी व कर्ज मंजूर करणाऱ्या नोंदणीकृत बँकेचे/वित्तीय संस्थेचे प्रतिनिधी यांचा समावेश आहे. मोका तपासणी आधारे लाभार्थीच्या बँक कर्ज खात्यावर अनुदान जमा करण्यात येईल. तपासणी दरम्यान आवश्यक सक्षम व्यक्ती/संस्थेचे आवश्यकतेनुसार प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाची राहील.

६) अर्थसहाय्याची रक्कम तत्वत: नोंदणीकृत बँकेने छाननी केलेल्या रकमेनुसार परिगणित करण्यात येईल याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार पूर्वसंमती देणाऱ्या अधिकाऱ्यांना राहील.

७) कृषि अवजारे सेवा केंद्राची उभारणी तसेच समाविष्ठ बाबींची खरेदी जागतिक बँकेने निर्धारित केलेल्या प्रापण पद्धतीनुसार करावयाची असून याबाबतची नियमावली तसेच सामाजिक व पर्यावरण विषयक नियमावली सोबत जोडण्यात आलेली असून त्याचे पालन करणे बंधनकारक राहील.

८) लाभार्थ्याने खोटी माहिती सादर केल्याचे आढळून आल्यास मान्यता रद्द करण्याचे अधिकार प्रकल्पातील अधिकाऱ्यांना राहतील.

९) प्रकल्पाची उभारणी पूर्ण केल्यानंतर प्रकल्पाचे अधिकारी व नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी मोका तपासणी करतील त्यांना सहकार्य करणे बंधनकारक राहील.

१०) सदर तत्वत: मान्यता देताना लाभार्थ्यास कुठल्याही प्रकारची पूर्वसुचना न देता बदल करणे, सुधारणा करणे आणि अटी व शर्तीचा समावेश करण्याचा अधिकार प्रकल्प संचालकांना राहील.

**उपविभागीय कृषि अधिकारी**
**(प्रकल्प संचालक, आत्मा /प्रकल्प संचालक अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी)**

**(मुख्यालय)-------------------**
**नाव -------------------------**
**स्वाक्षरी ----------------------**
**दिनांक ----------------------**

**प्रपत्र-४**

**कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी पूर्ण झालेनंतर लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटांसाठी अनुदान मागणीपत्र**

**प्रति,**

**उपविभागीय कृषि अधिकारी**

**उपविभाग -----------**

**जिल्हा ---------**

**विषय:** पूर्वसंमती नुसार उभारणी केलेल्या कृषि अवजारे सेवा केंद्रासाठी देय अनुदान मिळणेबाबत.

आम्ही, ----------------------------------- शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट दिनांक ------------रोजी अर्थसहाय्य मिळण्यासाठी केलेल्या अर्जानुसार संदर्भ --------------अन्वये पूर्व संमती मिळालेली आहे. प्रकल्प आराखडा व नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेच्या मंजुरीनुसार कृषि अवजारे सेवा केंद्राची उभारणी पूर्ण झाली असून कृषि अवजारे सेवा केंद्र पूर्ण क्षमतेने सुरू झालेला आहे. प्रकल्प उभारणीचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. प्रकल्प मंजूरीचा तपशील जा.क्र.व दि. :
मंजूर रक्कम रु :

२. कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी केल्याचा पत्ता - सर्वे नं. :
ठिकाण :

३. कर्ज मंजूरी व कर्ज वितरणाचा तपशील : बँकेचे नाव व शाखा :
कर्ज मंजूरी दि. :
कर्ज मंजूर रक्कम : रु.
कर्ज वितरण दि. :
कर्ज वितरण रक्कम : रु.

४. कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी सुरु केल्याचा दिनांक :

५. कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी पुर्ण केल्याचा दिनांक :

६. कृषि अवजारे सेवा केंद्रासाठी प्रत्यक्षात उभारण्यात आलेल्या सुविधांचा तपशील :

| अ.क्र. | बाब | परिमाण | प्रस्तावित | प्रत्यक्षात | प्रत्यक्षात झालेला खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | **शेड बांधकाम**<br>अ. क्षेत्रफळ<br>ब. बांधकामाचा खर्च | | | | |

| २ | **कृषि अवजारे, उपकरणे व संयंत्रांची यादी तपशीलासह**<br>अ.<br>ब.<br>क.<br>ड.<br>इ. | <br><br>नग<br>नग<br>नग<br>नग<br>नग | | | |
|---|---|---|---|---|---|

७. केंद्र किंवा राज्य शासनाच्या इतर योजनेतून प्रकल्पासाठी/प्रकल्पातील घटकासाठी अनूदान घेतलेले अथवा मागणी केलेली नाही.

८. प्रकल्प किंमतीचा तपशील.

| बाब | प्रकल्प अहवालानुसार किंमत | बँकेच्या कर्ज मंजूरीनुसार मंजूर खर्च | प्रत्यक्ष झालेला खर्च |
|---|---|---|---|
| शेड बांधकाम | | | |
| कृषि अवजारे, उपकरणे व संयंत्रे | | | |
| एकूण रक्क्म (लाख) | | | |

९. भांडवलाचा तपशील

| भांडवलाचा प्रकार | प्रकल्प अहवालानुसार नुसार | बँक अपरायजलनुसार | प्रत्यक्षात |
|---|---|---|---|
| शेतकरी उत्पादक कंपनी /गटातील सभासदांचा सहभाग | | | |
| बँकेचे कर्ज | | | |
| अनुदान | | | |
| इतर | | | |
| एकूण रु. (लाख) | | | |

१०. शेड उभारणी, कृषि अवजारे, उपकरणे व संयंत्रे खरेदीचा तपशील

| अ.क्र. | बाब | अपरायजल कॉस्ट | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| एकूण | | | |

११. भाडेतत्वावर कृषि अवजारे सेवा केंद्राची कार्यवाही सुरु झाल्याची तारीख- दि.

वरीलप्रमाणे कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी पूर्ण झालेली आहे. खरेदी प्रक्रियेसाठी वापरलेल्या कार्यपद्धतीनुसार दरपत्रके, तुलनात्मक तक्ता, पुराव्थादाराची निवड व कार्यानुभव आदेशाच्या प्रती सोबत जोडलेल्या आहेत. देय अनुदान सदर कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणीसाठी उघडण्यात आलेल्या कर्ज खाती जमा होण्यास विनंती आहे.

**प्राधिकृत अधिकारी**
**शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व**
**नोंदणीकृत शेतकरी/बचत गट**

**प्रपत्र-५**

**<u>मोका तपासणी अहवाल</u>**

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत प्रस्ताव मंजुर झाल्यावर अर्थ सहाय्य मुक्त करण्यापूर्वी द्यावयाचा मोका तपासणी अहवाल

१. लाभार्थी संस्थेचे नाव /पत्ता :

२. प्रकल्प मंजूरीचा तपशील जा.क्र.व दि. :
मंजूर रक्कम रु :

३. कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी केल्याचा पत्ता - सर्वे नं. :
ठिकाण :

४. कर्ज मंजूरी व कर्ज वितरणाचा तपशील : बँकेचे नाव व शाखा :
कर्ज मंजूरी दि. :
कर्ज मंजूर रक्कम : रु.
कर्ज वितरण दि. :
कर्ज वितरण रक्कम : रु.

५. कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी सुरु केल्याचा दिनांकं :

६. कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी पुर्ण केल्याचा दिनांक :

७. कृषि अवजारे सेवा केंद्रासाठी प्रत्यक्षात उभारण्यात आलेल्या सुविधांचा तपशील:

| अ.क्र. | बाब | परिमाण | प्रस्तावित | प्रत्यक्षात खरेदी | प्रत्यक्षात झालेला खर्च | अनुदानास पात्र खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **शेड बांधकाम**<br>अ. क्षेत्रफळ<br>ब. बांधकामाचा खर्च | <br>चौ. फुट<br>रु. | | | | |
| २ | **कृषि अवजारे, उपकरणे व संयंत्रांचा तपशीलासह**<br>अ.<br>ब.<br>क.<br>ड.<br>इ. | <br><br><br>नग<br>नग<br>नग<br>नग<br>नग | | | | |

८. केंद्र किंवा राज्य शासनाच्या इतर योजनेतून प्रकल्पासाठी/प्रकल्पातील घटकासाठी अनूदान घेतले आहे काय /मागणी केले आहे काय? (होय / नाही)

९. प्रकल्प किंमतीचा तपशील.

| बाब | प्रकल्प अहवालानुसार किंमत | बँकेच्या कर्ज मंजूरीनुसार मंजूर झालेला खर्च | प्रत्यक्ष झालेला खर्च |
|---|---|---|---|
| शेड बांधकाम | | | |
| कृषि अवजारे, उपकरणे व संयंत्रे | | | |
| प्राथमिक आणि पूर्व ऑपरेशनल खर्च | | | |
| एकूण रक्क्म (लाख) | | | |

१०. भांडवलाचा तपशील

| भांडवलाचा प्रकार | प्रकल्प अहवालानुसार नुसार | बँक अपरायजलनुसार | प्रत्यक्षात |
|---|---|---|---|
| शेतकरी उत्पादक कंपनी/गटातील सभासदांचा सहभाग | | | |
| बँकेचे कर्ज | | | |
| अनुदान | | | |
| इतर | | | |
| एकूण रु. (लाख) | | | |

११. शेड उभारणी, कृषि अवजारे, उपकरणे व संयंत्रे खरेदीचा तपशील

| अ.क्र. | बाब | अपरायजल कॉस्ट | प्रत्यक्ष खर्च | तपासणीत आढळून आलेल्या बाबी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| एकूण | | | | |

१२. भाडेतत्वावर कृषि अवजारे सेवा केंद्राची कार्यवाही सुरु झाल्याची तारीख- दि.

१३. तपासणी अधिकाऱ्याचे युनिट बाबत सविस्तर अभिप्राय-

१४. दर्शनी भागात “नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या अर्थसहाय्याने, लाभार्थीचे नाव ------------------------------------------------ वर्ष--------असे ठळक अक्षरात नमूद केले आहे - होय / नाही

प्रमाणित करण्यात येते की ------------------------------------------------------ यांच्या----------------------------------------------------------------------प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रकल्पाची प्रत्यक्ष तपासणी दिनांक -------------------------- रोजी केली आहे. सदरचा प्रकल्प पुर्ण झालेला असून दिनांक ----------------------- पासून कार्यान्वित झालेला आहे. त्याकरिता खरेदी करण्यात आलेल्या बाबींची प्रापण पद्धतीनुसार खरेदी करण्यात आलेल्या आहेत. त्याचा सविस्तर तपशील वरीलप्रमाणे असून प्रकल्पाच्या किमंतीबाबत प्रत्यक्ष बिलावरुन / इतर लेखा विषयक दस्तऐवजावरुन खात्री करण्यात आलेली आहे. प्रकल्पाची उभारणी मंजूर प्रकल्प अहवालातील तांत्रिक निकषानुसार व बाबींप्रमाणे झालेली आहे. त्याप्रित्यर्थ आवश्यकतेनुसार सक्षम व्यक्ती /संस्थेचे प्रमाणपत्र लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटांकडून प्राप्त करून घेतले आहे. तसेच नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार व नोंदणीकृत बँकेने/वित्तीय संस्थेने मंजूर केलेल्या प्रकल्प आराखड्यानुसार काम पूर्ण करण्यात आलेले आहे. सबब उपरोक्त शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटास वरील सुविधासाठी रु.------- लाख खर्च आलेला असुन घटकाच्या मापदंडाप्रमाणे सदर भांडवली खर्चाच्या ५० टक्के रक्कम रु.----------------------- (अक्षरी रक्कम रु. ----------------------------------------------------------------------) किंवा कमाल रु. ------------------- (अक्षरी रक्कम रु. ------------------------------------------------------) एवढे अनुदान मुक्त होण्याबाबत शिफारस करण्यात येत आहे.

**स्थळ :-**

**दिनांक :-**

**मोका तपासणी करणाऱ्या**
**अधिकाऱ्यांची स्वाक्षरी, नाव व पदनाम**

## कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी व अनुदान अदायगीसाठी फ्लो चार्ट

शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट

⇩

| | | |
|---|---|---|
| अर्ज, आवश्यक कागदपत्र व प्रकल्प आराखडा | = | शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट |

⇩

| | | |
|---|---|---|
| तांत्रिक पडताळणी-कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणीपूर्व मोका तपासणी | = | उपविभागीय कृषि अधिकारी / प्रकल्प संचालक, आत्मा |

⇩

| | | |
|---|---|---|
| पूर्वसंमती पत्र | = | उपविभागीय कृषि अधिकारी/प्रकल्प संचालक, आत्मा/कृषि व्यवसाय विशेषज्ञ (प्रकल्प स्तर) |

⇩

| | | |
|---|---|---|
| बँक अपरायजल-बँक कर्ज मंजूरी | = | नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्था |

⇩

| | | |
|---|---|---|
| कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी | = | लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट |

⇩

| | | |
|---|---|---|
| उभारणी पश्चात मोका तपासणी | = | उपविभागीय कृषि अधिकारी/प्रकल्प संचालक, आत्मा /कृषि व्यवसाय विशेषज्ञ (प्रकल्प स्तर) |

⇩

| | | |
|---|---|---|
| अनुदान अदायगी | = | उपविभागीय कृषि अधिकारी/प्रकल्प संचालक, आत्मा/ कृषि व्यवसाय विशेषज्ञ (प्रकल्प स्तर) |

## परिशिष्ट-१

### नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत

(उपविभागीय कृषि अधिकारी/प्रकल्प संचालक, आत्मा व प्रकल्प विशेषज्ञ, कृषि व्यवसाय यांनी प्रस्तावाची पूर्वसंमती देण्यासाठी छाननी करताना विचारात घ्यावयाचे मुद्दे)

| अ. क्र. | बाब | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गटाच्या मुख्य प्रवर्तकाचे नांव व पत्ता | | |
| २ | लाभार्थीचा प्रकार (शेतकरी उत्पादक कंपनी/नोंदणीकृत शेतकरी गट/बचत गट) | | |
| ३ | नोंदणी प्रमाणपत्र | | |
| ४ | कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी केंद्राचा पुर्ण पत्ता<br>संपर्क व्यक्तिचे नांव<br>फोन नंबर /इमेल | | |
| ५ | कृषि अवजारे सेवा केंद्राच्या जागेबाबतचा तपशील<br>१. ७ अ व १२ आणि ८अ -<br>२. भाडेपट्टी करारनामा /लिजडीड | | |
| ६ | अ. प्रकल्प अहवालानुसार कृषि अवजारे कृषि सेवा केंद्राची एकुण रक्कम<br>१. शेड बांधकाम<br>२. कृषि अवजारे, उपकरणे व संयंत्रे | रुपये ------------<br><br>रुपये ------------<br>रुपये ------------ | |
| ७ | बाब निहाय प्रस्तावीत खर्चाचा अंदाजित तपशील (बिले/दरपत्रके सोबत जोडावीत) | अ.क्र. बाब रुपये<br>१)<br>२)<br>३)<br>४)<br>५) एकूण रुपये | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | प्रस्तावित अवजारे, उपकरणे व संयंत्रे परिसरातील पिक पद्धतीशी सुसंगत आहे काय व ते ठेवण्यासाठी आवश्यक आकाराचे शेड प्रस्तावित आहे काय?<br>(होय/नाही) | | |
| ९ | प्रकल्प पूर्व मोका तपासणी केल्याचा अहवाल | १) अधिका-याचे नांव ------------------------------<br>२) मोका तपासणी दिनांक | |

सोबत प्रमाणे वैध काल मर्यादेतील व निर्धारित केलेल्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे खालीलप्रमाणे कागदपत्र सोबत जोडले आहे.

**कागदपत्रांचा तपशील:**

| अ.क्र. | कागदपत्रांची यादी | होय / नाही | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | विहित नमुन्यातील अर्ज | | |
| २ | जागेचा पुरावा<br>१) ७/१२ आणि ८ अ उतारा<br>२) भाडेपट्टी करार/ना हरकत प्रमाणपत्र | | |
| ३ | शेतकरी उत्पादक कंपनी /संघ व नोंदणीकृत शेतकरी /बचत गटाचे नोंदणी प्रमाणपत्र | | |
| ४ | लाभार्थी कंपनी/संघ/गटाच्या वतीने स्वाक्षरी करण्यास अधिकार पत्र सादर केले आहे काय? | | |

# परिशिष्ट-२

## नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत

(उपविभागीय कृषि अधिकारी/प्रकल्प संचालक, आत्मा व प्रकल्प विशेषज्ञ, कृषि व्यवसाय यांनी प्रकल्प उभारणी पश्चात तपासणी करताना विचारात घ्यावयाचे मुद्दे)

| अ. क्र. | बाब | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/ बचत गटाच्या मुख्य प्रवर्तकाचे नांव व पत्ता | | |
| २ | लाभार्थीचा प्रकार (शेतकरी उत्पादक कंपनी/संघ व नोंदणीकृत शेतकरी/बचत गट) | | |
| ४ | नोंदणी प्रमाणपत्र | | |
| ५ | कृषि अवजारे सेवा केंद्र उभारणी केंद्राचा पुर्ण पत्ता<br>संपर्क व्यक्तिचे नांव<br>फोन नंबर /इमेल | | |
| ६ | कृषि अवजारे सेवा केंद्राच्या जागेबाबतचा तपशील<br>१. ७ अ व १२ आणि ८अ -<br>२. भाडेपट्टी करारनामा /लिजडीड | | |
| ७ | नोंदणीकृत बँकेच्या/वित्तीय संस्थेच्या अपरायजल रिपोर्टनुसार कृषि अवजारे सेवा केंद्राची रक्कम | रुपये ------------ | |
| ८ | प्रकल्प मंजूर करणाऱ्या नोंदणीकृत बँकेचा व कर्ज मंजूरीचा तपशील | बँकेचे नांव---------------------<br>शाखा -----------------<br>प्रकल्पाची एकूण रक्कम----------<br>मंजुरीचा दिनांक--------------<br>मंजूर बँक कर्ज रु.------------<br>लाभार्थीचा हिस्सा रु.------ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | कृषि अवजारे सेवा केंद्रास नोंदणीकृत बँकेने कर्ज मंजुर केल्याचा तपशील | एकूण रु .-------------<br>कर्ज वितरीत केल्याचा दिनांक ----<br>व्याजाचा दर ---------<br>बँक कर्ज खाते क्रमांक ---------- | |
| १० | मंजुर कर्ज वितरणाचा तपशील | १.रक्कम - ----------दिनांक----<br>२.रक्कम - ----------दिनांक----<br>३.रक्कम - ----------दिनांक---- | |
| ११ | कृषि अवजारे सेवा केंद्राची उभारणी जागतिक बँकेने निर्धारित केलेल्या प्रापण पद्धतीनुसार झाली आहे काय?<br>(होय/नाही) | | |
| १२ | कृषि अवजारे सेवा केंद्राची उभारणी मार्गदर्शक सुचनेतील तांत्रिक मापदंडानुसार झाली आहे काय?<br>(होय/नाही) | | |

सोबत प्रमाणे वैध काल मर्यादेतील व निर्धारित केलेल्या अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीचे खालीलप्रमाणे कागदपत्र सोबत जोडले आहे.

**<u>कागदपत्रांचा तपशील:</u>**

| अ.क्र. | कागदपत्रांची यादी | होय / नाही | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | नोंदणीकृत बँक/वित्तीय संस्थेचे<br>१) कर्ज मंजुरीचे पत्र<br>२) कर्ज वितरणाचे पत्र<br>३) बँक अपरायजल रिपोर्ट<br>४) अनुदानाची रक्कम जमा करण्यासाठी बँकेचे नाव व बँक कर्ज खाते क्रमांक | | |

**परिशिष्ट - २**

**पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडा- ब**

**मूल्य साखळी उपक्रमांकरीता पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडा विकसीत करण्याकरीता प्रपत्र**

**बांधकामाशी निगडीत उपक्रमांकरिता पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडा**

**भाग १ - बांधकामाच्या टप्प्यांवर होणारे परिणाम व नुकसानीच्या उपशमनाची सूची**

| पर्यावरणीय बाब | परिणाम | उपशमन उपाय | अंमलबजावणीची जबाबदारी) | लागू आहे/नाही |
|---|---|---|---|---|
| जागेची निवड | अयोग्य/अनुचित जागेमुळे शाश्वतता, टिकाव, जैवविविधता, आपत्तीपासून बचाव इत्यादीवर अनेक प्रकारचे परिणाम होवू शकतात | उपक्रमासाठी निवडण्यात आलेली जागा ही अशा क्षेत्रामधील नसावी जिथे वन्यजीव संघर्ष क्षेत्रे, कचरा संकलन ठिकाण, अत्यंत प्रदूषित अथवा दूषित जमिन किंवा जलक्षेत्र, नैसर्गिक निचरा मार्ग, पूर प्रवण क्षेत्र इ. | गाव स्तरावर कृषि संजीवनी प्रकल्प समिती<br><br>कृषिमित्र<br><br>विभागीय पातळीवरील बहुविध विषय तज्ञसंघ | • लागू आहे<br><br>• लागू नाही) |
| कायदेशीर आणि नियामक अनुपालन | असे उपक्रम जे संबंधित कायदे आणि नियम यांचे अनुपालन करीत नाहीत त्यांना या प्रकल्पांतर्गत पुष्टी/मदत देण्यात येणार नाही | तपासणी सूची - अन्वये खालील बाबी निश्चीत कराव्यात -<br>• प्रस्तावित बांधकाम हे तपासणी सूची "**अ"** मधील विभाग भाग-२ "परवानगी नसलेल्या" उपक्रमांच्या यादीमध्ये (गैर-अनुषंगिक कृत्यांच्या यादीत) नाही<br>• प्रस्तावित बांधकाम विभाग तपासणी सूची "**अ"** मधील विभाग भाग-३ मधील आवश्यक त्या कायदेशीर आणि नियामक तरतुदींचे अनुपालन करीत आहे | गाव स्तरावर कृषि संजीवनी प्रकल्प समिती<br><br>कृषि उत्पादक कंपनी<br><br>विभागीय पातळीवरील बहुविध विषय तज्ञसंघ | • लागू आहे<br><br>• लागू नाही |
| वृक्षतोड आणि झाडो-याची सफाई/छाटणी | वृक्ष व हरित अच्छादन नष्ट होणे | • वृक्षतोड परवानगी ज्या अटींच्या आधारे देण्यात आलेली आहे त्याच्या अधीन राहून क्षतिपूर्ती वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेण्यात येतील तोडण्यात आलेल्या प्रत्येक वृक्षासाठी योग्य प्रमाणात विविध स्थानिक प्रजातींची | विभागीय पातळीवरील बहुविध विषय तज्ञसंघ | • लागू आहे<br><br>• लागू नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | लागवड केली जाईल वृक्ष संरक्षणासाठी कुंपण आणि वृक्षारोपणानंतर देखभाल करण्याची तरतूद निश्चीत केली जाईल | | |
| आरोग्य आणि सुरक्षा | कामाच्या ठिकाणी अपघातांचा धोका | • सर्व कामगारांना पुरेशी वैयक्तिक सुरक्षेकरिता साधने/ उपकरणे पुरविली जातील<br>• बांधकामाच्या ठिकाणी वैयक्तिक सुरक्षेकरीतेच्या साधने/उपकरणांचा वापर बंधनकारक असेल | • वैयक्तिक मालकीच्या इमारतीबाबत लाभार्थी हा सुरक्षेसंबंधीचे नियमपालनाबाबत जबाबदार असेल<br>• सामुदायिक कामांच्या बाबतीत गाव स्तरावर कृषि संजीवनी प्रकल्प समिती / गट मागदर्शक तत्वांच्या आधारे सुरक्षा उपाययोजनांचे पालन करेल<br>• विभागीय पातळीवरील बहुसमावेशक संघ | • लागू आहे<br>• लागू नाही |
| पाण्याची गुणवत्ता | साचलेले आणि प्रक्रिया न केलेले सांडपाणी सोडल्यास जवळच्या पाणीसाठयांना , जल स्त्रोत यांना प्रदुषित करु शकते | • कोणतीही प्रक्रिया न करता सांडपाणी हे शुध्द, स्वच्छ पाण्याचे साठे, जलस्त्रोत, प्रवाह इ. मधे सोडू नये<br>• सर्व सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यापूर्वी MPCB सामान्य मानकांची पूर्तता करण्यात येईल | • आत्मा<br>• शेतकरी उत्पादक कंपन्या<br>• विभागीय पातळीवरील बहुसमावेशक संघ | • लागू आहे<br>• लागू नाही |
| कचरा व्यवस्थापन | कचऱ्याची अयोग्य पध्दतीने विल्हेवाट उदा. उघडयावर कचरा साठवणे, जाळणे, अनधिकृत पध्दतीने कच-याची पुर्नवापरा साठीची प्रकिया करणे, इ. मुळे प्रदुषण आणि | जैवसंवर्धनक्षम आणि अजैवसंवर्धनक्षम कच-याची विल्हेवाट स्वतंत्रपणे लावणे कचरा व्यवस्थापनासाठी भारत सरकारचे तसेच महाराष्ट्र शासनाचे सर्व लागू होणारे संबंधित कायदे व नियमांचे पालन करणे | शेतकरी उत्पादक कंपन्या | • लागू आहे<br>• लागू नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आरोग्यावर घातक परिणाम होणे | | | |
| संरचित सांस्कृतिक संसाधने | सांस्कृतिक कलाकृतींची हानी/नष्ट होणे | उत्खननाच्या कामात पुरातत्वीय महत्व असलेले उदा (नाणी, वापरातील वस्तू भांडी,कलाकृती,संरचना इ.) सापडल्या तर पुरातत्व विभागाला अधिसूचित करण्यात यावे | गाव स्तरावर कृषि संजीवनी प्रकल्प समिती<br><br>कृषि उत्पादक कंपनी<br><br>विभागीय पातळीवरील बहुविध विषय तज्ञसंघ | • लागू आहे<br><br>• लागू नाही |
| मानव संसाधन क्षमता | पर्यावरणीय व्यवस्थापनाची क्षमता कमी असणे | मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि माहिती, शिक्षण आणि संप्रेशन (IEC) याचा वापर या व्दारे क्षमता वृध्दी करणे | प्रकल्प व्यवस्थापन कक्ष<br>आत्मा | • लागू आहे<br><br>• लागू नाही |
| अनुपालन नियंत्रण | पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडयाची योग्य अनुपालन न केल्यास गंभीर स्वरुपाचे परिणाम होऊ शकतात आणि शाश्वतता धोकयात येवु शकते | प्रकल्पाच्या -संनियंत्रण आणि मूल्यमापन' पध्दतीप्रमाणे मूल्यमापन आणि अहवाल | प्रकल्प संनियंत्रण आणि मूल्यमापन पध्दतीप्रमाणे | • लागू आहे<br><br>• लागू नाही |

महाराष्ट्र शासन

कृषि विभाग

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

३० अ/ ब, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड मुबई -४०० ००५

दुरध्वनी क्र. : ०२२ २२१६३३५१/५२ ई-मेल : mahapocra@gmail.com

क्र.नादेकृसंप्र/ प्रापण / प्र.क्र.१२४ /२०१८ दिनांक ०४/१०/२०१८

**प्रकल्पांतर्गत प्रापण (खरेदी )विषयक बाबी हाताळण्यासाठी मार्गदर्शक सुचना**

## परिपत्रक

कृषि विभागाच्या शासन निर्णय क्र. हअप्र-०७१६/प्र.क्र.८२/राकृवियो कक्ष,दिनांक १७/०१/२०१८ अन्वये राज्यातील १५ जिल्हयांमधील ५१४२ गावांमध्ये ६ वर्ष कालावधीत (२०१८-१९ ते २०२३-२४ पर्यंत) नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. प्रकल्पाची अंमलबजावणी सुरळीत पणे होण्यासाठी व प्रकल्पाअंतर्गत होणाऱ्या खरेदीचे व्यवस्थापन योग्य प्रकारे करण्यासाठी "प्रापण पुस्तिका"(Procurement Manual) तयार करण्यात आली असुन त्यास जागतिक बँकेने व राज्यशासनाने मंजुरी दिलेली आहे.

प्रकल्पासाठी प्रापण व्यवस्थापन प्रणाली तयार करणे हा प्रकल्पासाठीच्या प्रापण व्यवस्थापन पुस्तिकेचा उदेश आहे. प्रकल्पाअंतर्गत असलेल्या सर्व १५ जिल्ह्यामध्ये एकसमान प्रापण पद्धत्ती राबविणे आवश्यक आहे. प्रकल्पासाठी अवलंबविण्यात येत असलेली प्रापण पद्धत्ती विविध जिल्ह्यांमध्ये एकसारखेपणा प्रदान करेल, सर्व संपादणूकीवर पुरेसे आणि योग्य नियंत्रण ठेवील तसेच प्रकल्पांतर्गत खरेदीच्या नोंदी योग्य प्रकारे करणे सुनिश्चित करेल. तसेच खरेदीच्या नोंदी राखण्यात अचूकता आणि विश्वसनीयता सुनिश्चित करणे हा प्रकल्पाच्या प्रापण व्यवस्थापन पुस्तिकेचा हेतू आहे .

प्रकल्पांतर्गत राज्यस्तर,जिल्हास्तर, उपविभागस्तर व ग्रामस्तरावर विविध बाबींची संपादणूक करण्यात येणार आहे. सदरची खरेदी योग्य प्रकारे करण्यासाठी प्रापण पुस्तिकेतील महत्वाच्या बाबी या परिपत्रकाव्दारे सर्वांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहेत.

### अ. खरेदी समिती गठीत करणे :

प्रकल्पांतर्गत राज्यस्तर,जिल्हास्तर, उपविभागस्तर व ग्रामस्तरावर विविध बाबींची संपादणूक करण्यात येणार आहे. सदरची खरेदी योग्य प्रकारे करण्यासाठी प्रत्येक स्तरावर खरेदी समिती गठीत करणे आवश्यक आहे .खरेदीच्या प्रत्येक स्तरावरी समितीची रचना खालील प्रमाणे असेल :

**१.राज्यस्तर (प्रकल्प व्यवस्थापन कक्ष)**

| अ.क्र. | पदनाम | स्थान | निविदा स्वीकारणारे प्राधिकारी |
|---|---|---|---|
